सोमवार, २१ मार्च २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २४२
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

महाविकास आघाडीत पुन्हा नाराजीनाट्य

कोल्हापूर : महाविकास आघाडीतील नाराजीनाट्याचा आणखी एक अंक समोर आला आहे. कोल्हापुरात महाविकास आघाडीचा मेळावा रविवारी (दि. २०) आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला शिवसेनेचे नेते आणि माजी आमदार राजेश क्षीरसागर उपस्थित नव्हते. त्यामुळे क्षीरसागर अजूनही नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. कोल्हापुरात झालेल्या मेळाव्याला महाविकास आघाडीतील ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ, सतीश पाटील यांच्यासह अरुण दुधवडकर यांनी हजेरी लावली, पण माजी आमदार राजेश क्षीरसागर आले नाही. दरम्यान, नाराज राजेश क्षीरसागर यांनी सायंकाळी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. क्षीरसागर यांच्या घराबाहेर हजारो कार्यकर्ते जमा झाले होते. त्यांनी भगवे झेंडे हातात घेऊन घोषणाबाजी केली. त्यामुळे क्षीरसागर यांच्या मनात नेमके काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. **(सविस्तर पान २ वर..)**

अंतरंग

खोटे सोने तारणातून कामोठ्यात बँकेला ३४.५६ लाखांचा गंडा/२
मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी/५
राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्र उपविजेता/६

सगळी मिली जुली कुस्ती!

उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यावर देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया

मावळ : प्रतिनिधी

शिवसेनेच्या शिव संपर्क अभियानासाठी पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या सर्व खासदारांना आणि जिल्हाप्रमुखांना रविवारी (दि. २०) संबोधित केले. या वेळी बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एमआयएमच्या प्रस्तावाबाबतही भाष्य केले. त्यावर माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

शिवसेनेचे हिंदुत्व महाराष्ट्रभर पोहचवून एमआयएमचा कट उधळून लावा. आपण महाविकास आघाडी म्हणून एक आहोत, महाविकास आघाडीचा धर्म आपल्याला पाळायचा आहे, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले होते.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मावळमधील इंदूरी येथे झालेल्या बैलगाडा शर्यतीला उपस्थिती लावली असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यावर भाष्य केले. मुख्यमंत्री पत्रकार परिषद घेत नाहीत. ते अजान स्पर्धा भरवणार, जनाब बाळासाहेब ठाकरे लिहिणार आणि त्यांचे घटक पक्ष हे एमआयएमसोबत जाण्याचा विचार करीत आहेत. त्या वेळेस आरोपही तेच करणार. ही सगळी मिली जुली कुस्ती आहे. सगळे मिळून खेळत आहेत, असे फडणवीस म्हणाले.

जे बैलगाडा शर्यतीवर बंदी आणण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांनी मावळात येऊन बैलगाडा शर्यत येऊन पहावी. या शर्यती सुरू व्हाव्यात म्हणून मी एक कमिटी स्थापन केली. त्यांनी बैल धावणारा प्राणी आहे हे त्यातून सिद्ध करून दाखवले. हाच अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला, तेव्हा ही शर्यत झाली. मला आज आनंद आहे माझा बैलगाडा इथे धावला, पहिला नंबरही आला. २०१४ आणि २०१९मध्येही जनतेने आम्हाला पहिले आणले, पण काहींनी शाळा केली. मावळच्या धर्तीवर ज्याचा बैलगाडा पहिला आला तो कधी मागे हटत नाही, असेही फडणवीस यांनी या वेळी म्हटले.

शिवसेना दिशाहीन -ना. नारायण राणे

जामनेर : शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. शिवसेनेला तत्त्व किंवा धोरण नाही. दिशाहीन पक्ष म्हणजे शिवसेना, अशी टीका केंद्रीय मंत्री राणे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना केली.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)

हुतात्म्यांचे कार्य भावी पिढीपर्यंत नेणे आवश्यक

आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

पनवेल : रामप्रहर वृत्त

हुतात्म्यांच्या जाज्वल्य इतिहासाची पार्श्वभूमी आपल्याला लाभली आहे. त्यामुळे त्यांची गाथा पुढील पिढीपर्यंत सातत्याने नेत राहिली पाहिजे, तरच नव्या पिढीला त्याची अनुभूती येऊन येणाऱ्या भविष्यात कशा प्रकारे पावले उचलली जावी याचे दिशादर्शन घडत राहील, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते गीतांजली कार्यक्रमात बोलत होते.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि संस्कार भारती उत्तर रायगड जिल्हा पनवेल समितीच्या वतीने गीतांजली या देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. १९) करण्यात आले होते. पनवेल शहरातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमात इतिहास संशोधक, अभ्यासक व लेखक चंद्रकांत शहासने आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते हुतात्म्यांच्या वंशजांना मानपत्र देऊन हुतात्म्यांचे स्मरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेविका चारूशीला घरत, रूचिता लोंढे, संस्कार भारतीच्या कोकण प्रांत उपाध्यक्ष सुनिता खरे, महामंत्री विजय काळे, कोषाध्यक्ष रवींद्र फडणीस, संगीत विधा संयोजक रसिका फडके, उत्तर रायगड जिल्ह्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष पांडुरंग गरवारे, उपाध्यक्ष भारती म्हसे, दीपक पळसुले, पनवेल समिती अध्यक्ष वैशाली कुलकर्णी, 'रंगनील'च्या कल्पना कोठारी व नागरिक उपस्थित होते.

राष्ट्रीय एकतेच्या भावनेतून जे लढले, झगडले आणि प्रसंगी आपले प्राण अर्पण केले अशा हुतात्म्यांच्या वंशजांचा या कार्यक्रमात मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये शिवराम राजगुरू यांच्या ज्येष्ठ बंधूंचा नातू सत्यशील राजगुरू, रामा बामा कोळी यांच्या धाकट्या भावाचा मुलगा महादेव कमळ कोळी, मामलेदार जोशी यांचे नातू विलास जोशी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला गेला. **(पान २ वर..)**

चिनी बनावटीचे १२०० ड्रोन जप्त

जेएनपीटीत पावणे पाच कोटींचा साठा हस्तगत

उरण : प्रतिनिधी, वार्ताहर

जेएनपीटी बंदरातून रक्तचंदनानंतर आता चिनी बनावटीच्या बंदी घालण्यात आलेल्या खेळण्यातील ड्रोनची तस्करी उघड झाली आहे. न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या क्राइम इंटेलिजेन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी इंधन पंपाच्या नावाने आयात करण्यात आलेल्या १२०० ड्रोनचा साठा एका ४० फुटी कंटेनरमधून ताब्यात घेतला आहे. या ड्रोनची किंमत सुमारे पाच कोटींच्या घरात आहे. याआधीही डीआरआयच्या विभागाने ३६ ड्रोनचा साठा जप्त केला होता.

जेएनपीटी बंदरातून याआधी सोने, चांदी, शस्त्रास्त्रे, अमली पदार्थ, सापांची कातडी यांची मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जात होती. त्यानंतर मागील काही वर्षांपासून आखाती देशात निर्यात होणाऱ्या रक्तचंदनाच्या तस्करीला उधाण आले. त्यानंतर आता देशात बंदी घालण्यात आलेल्या चिनी बनावटीच्या ड्रोनची तस्करी समोर आली आहे.

चीनमधून खेळणी आणि इंधन पंपाच्या नावाने हा ड्रोनचा साठा जेएनपीटी बंदरामार्गे एका एजन्सीमार्फत आयात करण्यात आला होता. खबऱ्याकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रोनचा साठा जप्त करण्याची ही पहिलीच वेळ आहे. **(पान २ वर..)**

रायगड जि. प.वर प्रशासक

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषदेवर सोमवार (दि. २१)पासून प्रशासकीय राजवट लागू होणार आहे. विद्यमान जिल्हा परिषदेची मुदत रविवारी संपुष्टात आली.

विद्यमान जिल्हा परिषदेत शेतकरी कामगार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची पाच वर्षे सत्ता राहिली आहे. पहिल्या अडीच वर्षांसाठी राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांच्याकडे अध्यक्षपद होते, तर उर्वरित अडीच वर्षांसाठी शेकापच्या योगिता पारधी अध्यक्ष होत्या. मावळत्या जिल्हा परिषदेत ५९ सदस्य होते. शेकाप २३, राष्ट्रवादी १२, शिवसेना १८, भाजप व काँग्रेस प्रत्येकी तीन असे पक्षीय बलाबल होते.

निवडक

पती, मुलांच्या डोळ्यांदेखत महिलेवर सामूहिक बलात्कार

ढोलपूर : शेतातून परतणाऱ्या विवाहित महिलेवर तिच्याच पती आणि मुलांसमोर सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना राजस्थानमधील ढोलपूर जिल्ह्यात घडली आहे. याबाबत पीडित महिलेने पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात तक्रार दिली असून आपल्या दलित पतीलाही आरोपींनी मारहाण केल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, राष्ट्रीय महिला आयोगाने या घटनेची दखल घेतली आहे.

कोविशिल्ड लसीच्या दोन डोसमधील अंतर होणार कमी

नवी दिल्ली : कोरोनावरील कोविशिल्ड या लसीच्या दोन डोसमधील अंतर कमी करण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय तांत्रिक सल्लागार समितीने (एनटीएजीआय) याबाबत केंद्र सरकारकडे शिफारस केली आहे. कोविशिल्डचा दुसरा डोस हा आता आठ ते सोळा आठवड्यांच्या दरम्यान दिला जावा असा सल्ला देण्यात आला आहे.

पनवेल : भाजप नेते एकनाथ देशेकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भानघर येथील करूणेश्वर वृद्धाश्रमात फळे व कपड्यांचे वाटप केले. या वेळी सरपंच कमला देशेकर, भाजप तालुका चिटणीस नामदेव जमदाडे, रवींद्र पाटील, भालचंद्र शिनारे, दीपक बोडे, रोशन पाटील, संतोष ढोरे, मंगेश पाटील, महादेव गडगे, पिंटू म्हात्रे, अनिकेत देशेकर उपस्थित होते.

महाडमध्ये भीमसागर लोटला

चवदार तळे सत्याग्रहाच्या वर्धापन दिनी महामानवाला अभिवादन

महाड : प्रतिनिधी

चवदार तळे सत्याग्रहाच्या ९५व्या वर्धापन दिनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी महाडमध्ये रविवारी (दि. २०) भीमसागर लोटला. यामुळे चवदार तळे, क्रांतिस्तंभ परिसरासह महाड शहर जय भीमच्या घोषणेने दणाणून गेले.

भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी महाडमध्ये सामाजिक क्रांती केली. चवदार तळ्याचा ज्या पायऱ्यांनी ते खाली उतरले व पाण्याला स्पर्श केला त्या पायऱ्यांवर भीम अनुयायांनी पाणी प्राशन करण्यासाठी आणि चवदार तळ्याचे पाणी कलशातून घेऊन जाण्यासाठी एकच गर्दी केली होती.

(छाया : महेश शिंदे)

या वेळी विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय संघटनांच्या वतीने अभिवादन सभाही आयोजित करण्यात आल्या होत्या, तर भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, बौद्धजन पंचायत समितीच्या मीराताई आंबेडकर, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे मनोज संसारे, भारत मुक्ती मोर्चाचे वामन मेश्राम यांच्यासह अनुयायी महाडमध्ये येऊन बाबासाहेबांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक झाले.

दरम्यान, भाजपच्या वतीने चवदार तळे येथे मोफत अन्नदान करण्यात आले.

टाकाऊ कचऱ्यापासून पनवेल सजले

पनवेल : नितीन देशमुख

पनवेल महापालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर उभारण्यात आलेला रंगीबेरंगी मासा तेथे येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतो तसेच छत्रपती शिवाजी चौकातील स्वच्छतादूतांच्या प्रतिकृती, पोदीवरील पिल्लेज कॉलेजजवळ टायरपासून बनवलेले पक्षी पनवेल शहराच्या सौंदर्यात भर तर घालतातच, शिवाय टाकाऊ कचऱ्यापासूनसुद्धा टिकाऊ वस्तूंची निर्मिती होऊ शकते याचा उत्तम संदेशही नागरिकांना देत आहेत.

आज प्रत्येक महानगरात कचऱ्याचा प्रश्न बिकट होत आहे. अनेक टाकाऊ वस्तू नागरिक रस्त्यावर टाकून शहराचे सौंदर्य बिघडवत असतात. पनवेल

महापालिकेने महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या संकल्पनेतून टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवून त्या शहरातील मुख्य चौकात लावून शहर सजवले आहे. त्यासाठी पनवेल महापालिकेने माझी वसुंधरा व स्वच्छ भारत अभियानांतर्गत टाकाऊपासून टिकाऊ वस्तूंची स्पर्धा घेतली होती. महापालिका कार्यक्षेत्रातील नऊ ते सत्तर वर्षांपर्यंतच्या अबालवृद्धांनी व सोसायट्यांनी रोजच्या घरातील टाकाऊ वस्तूंपासून सजावटीच्या तसेच उपयोगी वस्तू तयार केल्या. **(पान २ वर..)**

पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून प्रेरणा -महापौर डॉ. कविता चौतमोल

वाराणसी येथे झालेल्या महापौर परिषदेच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आम्हाला एक टास्क दिला होता की तुमच्या महापालिका हद्दीतील सर्व नागरिकांचा समावेश होईल व ते भाग घेतील अशी स्पर्धा घ्या. त्याप्रमाणे आम्ही नगरसेवक, आयुक्त आणि उपायुक्त यांनी चर्चा करून टाकाऊ कचऱ्यापासून टिकाऊ वस्तू बनवण्याची स्पर्धा घेतली. या स्पर्धेत ९०पेक्षा जास्त जणांनी भाग घेतला. यामध्ये तयार करण्यात आलेल्या वस्तू आम्ही शहरातील मुख्य ठिकाणी बसवल्या आहेत. ही संकल्पना आवडल्याचे अनेकांनी सांगितले. पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यास महापालिका हद्दीत सगळीकडे अशी सजावट करणार आहोत, असे महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी सांगितले.

तुकाराम बीजनिमित्त देहू नगरी दुमदुमली

देहू : प्रतिनिधी

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा ३७४वा वैकुंठगमन अर्थात तुकाराम बीज मोठ्या भक्तिमय वातावरणात रविवारी (दि. २०) देहूमध्ये झाली. यानिमित्ताने इंद्रायणीकाठी वारकऱ्यांचा मेळा भरला होता. राज्यभरातून भाविक देहूनगरीत दाखल झाले होते.

संत तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठ गमनाचा हा दिवस होता, असे सांगितले जाते. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून साजरा केला जातो. कोरोनामुळे गेली दोन वर्षे तुकाराम महाराज बीज साधेपणाने होत होती. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव नसल्याने वारकरी, भाविकांनी देहूत अलोट गर्दी केली होती. त्यांनी बीजनिमित्त गाथेचे पारायण करून तुकाराम महाराजांचा जयघोष केला.

पनवेल : उलवे भोजपुरिया सांस्कृतिक मंचच्या वतीने भव्य होळी मिलन समारंभाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. उलवे नोड सेक्टर २०मधील रेड क्लिप स्कूलजवळ झालेल्या या समारंभात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. या समारंभाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या, तर आयोजकांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजपचे युवा नेते निलेश खारकर, रामदास नाईक, कैलास मिश्रा, मुन्ना शर्मा, सर्वेशसिंग राणा, आकलेश यादव, आकलेश तिवारी, आदेश सिंग, चंदेश्वर शर्मा, कुलदीप तिवारी आदी उपस्थित होते.

निवडक

पनवेलमधून दोन दुचाकींची चोरी

पनवेल : पनवेल परिसरातून दोन मोटरसायकलींची चोरी झाल्याची घटना घडली आहे. गणेश चिकणे यांनी त्यांची सव्वा लाख रुपये किमतीची यामाहा आर १५ मोटरसायकल (एमएच ४६ सिसि ५१०८) ही करंजाडे येतील साई कमल ब्रिडींगच्या पार्किंगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेली आहे. दुसऱ्या घटनेत अंकित शर्मा यांची ४० हजार रुपये किमतीची यामाहा कंपनीची मोटरसायकल (एमएच ४६ एएस ८३७१) ही महेश भवन येथे ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरली. दोन्ही तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत.

शिरढोणमध्ये शाळेतून टॅबची चोरी

पनवेल : शिरढोण येथील दिल्ली पब्लिक स्कूलच्या आवारात असलेल्या केबिनमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून तेथील टेबलावर ठेवलेला लिनोओ कंपनीचा टॅब चोरून नेला आहे. एका अनोळखी व्यक्तीने या ठिकाणी आत प्रवेश करून सहा हजार किमतीचा लिनोओ कंपनीचा टॅब चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कांचन आसरकर यांना पुरस्कार

उरण : घे भरारी बहूउद्देशीय सामाजिक संस्था रायगड या संस्थेचे अध्यक्ष तथा महिला सामाजिक कार्यकर्त्या

कांचन मंदार आसरकर यांच्या कार्याची दखल घेत स्वप्नल फाउंडेशनतर्फे पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात कांचन आसरकर (लब्दे) यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देण्यात आला. माजी पोलीस महानिरीक्षक विठ्ठल जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. या वेळी स्वप्नल फॉउंडेशनचे अध्यक्ष दत्ता कोहिनकर, उपाध्यक्ष रवी सावंत, सचिव अनिल भुजबळ, असिस्टंट एस पी –सुनील हिरुरकर आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

महिलांसाठी रंगपंचमीनिमित्त कार्यक्रम

पनवेल : क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे फक्त महिलांसाठी रंगपंचमी इव्हेंट सेलिब्रेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवीन पनवेल सेक्टर १६ पिल्लाई गर्ल्स हॉस्टेलच्या बाजूला असलेल्या मैदानावर या इव्हेंटचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि. २२) सकाळी १० ते संध्याकाळी ४ पर्यंत हा कार्यक्रम होणार असून यामध्ये विविध फन गेम्स आहेत. यासाठी प्रवेश फि १०० रुपये असून महिलांनी जास्तीत जास्त संख्येने यात सहभागी व्हावे. प्रवेशासाठी ८६५२४१४३४३ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करण्याचे आवाहन अध्यक्ष रूपाली शिंदे यांनी केले आहे.

महाविकास आघाडीत नाराजीनाट्य

कोल्हापूरमधील मेळाव्याकडे राजेश क्षीरसागर यांची पाठ

कोल्हापूर : प्रतिनिधी

महाविकास आघाडीतील नाराजी नाट्याची आणखी एक बातमी समोर आली आहे. कोल्हापुरात महाविकास आघाडीचा रविवारी (दि. २०) मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला शिवसेनेचे नेते आणि माजी आमदार राजेश क्षीरसागर उपस्थित नव्हते. त्यामुळे क्षीरसागर अजूनही नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. कोल्हापुरात झालेल्या मेळाव्याला महाविकास आघाडीतील ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ, सतीश पाटील यांच्यासह अरुण दुधवडकर यांनी हजेरी लावली, पण शिवसेनेचे माजी आमदार राजेश क्षीरसागर आले नाही. क्षीरसागर हे बडे नेते आहेत. त्यांनी महाविकास आघाडीच्या मेळाव्याच्या कार्यक्रमाला न आल्याने जिल्ह्यात विविध चर्चांना उधाण आले आहे.

कोल्हापूर उत्तर विधानसभेच्या पोटनिवडणुकीमुळे महाविकास आघाडीत नाराजी नाट्य बघायला मिळत आहे. काँग्रेस आमदार चंद्रकांत जाधव यांच्या मृत्यूनंतर कोल्हापूर उत्तरची जागा वर्षभरापासून रिक्त आहे. या जागेवर आता पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पोटनिवडणुकीची घोषणा झाल्यानंतर लगेच राजेश क्षीरसागर यांनी निवडणूक लढण्याचा निर्धार केला होता. त्यांनी व्हॉट्सॲप स्टेटसला 'कोल्हापुरात पुन्हा भगवाच' अशा आशयाची पोस्ट टाकली होती. त्यामुळे शिवसेना या निवडणुकीच्या रणधुमाळीत उतरणार अशी चर्चा रंगली होती. पण नंतर शिवसेनेच्या वरिष्ठांनी पोटनिवडणुकीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला. शिवसेनेने कोल्हापूर उत्तरची जागा मित्रपक्ष असलेल्या काँग्रेससाठी सोडली. याच निर्णयावरुन राजेश क्षीरसागर नाराज झाल्याची माहिती आहे. त्याच नाराजीतून गेल्या दोन दिवसांपासून नॉट रिचेबल होते. त्यानंतर कोल्हापुरात आज झालेल्या महाविकास आघाडीच्या कार्यक्रमातही त्यांनी हजेरी लावली नाही. त्यामुळे महाविकास आघाडीत नाराजी नाट्य सुरूच असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.

दरम्यान राजेश क्षीरसागर यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. क्षीरसागर यांच्या घराबाहेर हजारो कार्यकर्ते जमा झाले. त्यांनी भगवे झेंडे हातात घेऊन घोषणाबाजी केली.

किरीट सोमय्यांचा पुन्हा यशवंत जाधवांवर हल्लाबोल

मुंबई : प्रतिनिधी

भाजप नेते किरीट सोमय्यांनी पुन्हा एकदा नव्या ट्विटने शिवसेना यशवंत जाधव हल्लाबोल केला आहे.

शिवसेना नेते यशवंत जाधव आणि आमदार यामिनी यशवंत यांनी २४ महिन्यांत मुंबईत १००० घर/दुकान/गाळे असलेल्या ३६ बिल्डिंग (जुन्या पघडीचा इमारती) विकत घेतल्या. एक हजार रुपये कोटींचा घोटाळा बाहेर आला आहे. ईडी, कंपनी मंत्रालय, आयकर विभागाद्वारे तपास चालू आहे, काही दिवसात कारवाईची अपेक्षा आहे, असे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे. जाधव परिवाराकडे एवढी मालमत्ता आहे तर त्यांचा मालक–नेत्यांकडे किती असणार, असा सवाल सोमय्यांनी उपस्थित केला आहे.

गेल्या महिन्यात शिवसेना नेते आणि मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या घरी आयकर विभागाने धाडी टाकल्या. यशवंत जाधव यांच्याशी संबंधीत एक दोन ठिकाणी नाही तर तब्बल ३० पेक्षा जास्त ठिकाणी आयकर विभागाने धाडी टाकल्या होत्या. ज्यात जवळपास एक कोटी रुपये रोख आयकर विभागाला आढळल्याचे बोलले जात आहे. शिवाय बेनामी संपत्तीचे कागदपत्रे, कॉम्प्युटर हार्ड डिस्क, लॅपटॉप, मोबाइल फोन, प्रिंटर, स्कॅनर, सरकारी दस्तावेज पैशांची आणि व्यवहारांची नोंदी केलेली डायरी सापडली आहे.

खारघरमधील भुयारी मार्गाची डागडुजी

भाजप नेते प्रभाकर घरत यांच्या पाठपुराव्याला यश

खारघर : रामप्रहर वृत्त

खारघर रेल्वे स्टेशनबाहेरील भुयारी मार्गामधील रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी सिडकोच्या खारघर मधील कार्यकारी अभियंतांना निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेत रविवारी (दि. २०) या भुयारी मार्गामधील रस्त्याची डागडुजी करण्यास सुरुवात झाली आहे.

खारघर रेल्वे स्टेशन येथील भुयारी मार्गामधील रस्ता खराब झालेला होता. रस्त्याला पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतुक कोंडी होते तसेच रिक्षा व दोन चाकी वाहनांची खड्ड्यांमुळे पडझड होत होती. त्यामुळे सिडकोने हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावा, जेणेकरून तेथील नागरिकांची गैरसोय होणार नाही व वाहतूक कोंडीही होणार नाही, असे प्रभाकर घरत यांनी सिडकोला दिलेल्या निवेदनात म्हटले होते.

कसळखंड गावात विकासकामांचा शुभारंभ

पनवेल : रामप्रहर वृत्त

कसळखंड ग्रुप ग्रापंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांचा वाढदिवस विविध सामजिक उपक्रम राबवून साजरा झाला. त्याअंतर्गत आमदार महेस बालदी यांच्या स्थानिक आमदार निधीतून करण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन माजी सरपंच डॉ. अविनाश गाताडे यांच्या हस्ते रविवारी (दि. २०) झाले. तसेच या वेळी आंगणवाडीच्या दुरुस्तीच्या कामाची शुभारंभ झाला.

कसळखंड ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्याच्या कामाचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीमधून करण्यात येणार आहे. त्यानुसार पालटा माल ते जे. के. पाटील यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याच्या कामांचा शुभारंभ कसळखंड ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून झाला आहे. पाच लाख रुपये निधी वापरून ह्या रस्त्याचे काम करण्यात येणार आहे तसेच माधुरी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवाजीनगर अंगणवाडीच्या दुरुस्तीचे कामही सुरू झाले आहे.

सरपंच माधुरी पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य

या वेळी उपसरपंच महेंद्र गोजे, माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, गणेश अगिवले, सचिन दुर्गे, माजी सरपंच जे. के. पाटील, निवेदिता लबडे, माजी उपसरपंच सरपंच रजना नाईक, महादेव पाटील, रवि घरत, जयेश मते, जगदीश पाटील, श्री. गाडे, माई गायकर, कविता मते, बूथ अध्यक्ष यशवंत पाटील, तानाजी पाटील, दिनेश नाईक, जगदीश पाटील, संतोष घरत, तुलशीराम घरत, हरेश पाटील, मनीषा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

खोटे सोने तारणातून कामोठ्यात बँकेला ३४.५६ लाखांचा गंडा

पनवेल : वार्ताहर

कामोठे येथील दि सह्याद्री सहकारी बँकेमध्ये पाच ग्राहकांनी एक किलो १९९ ग्रॅम वजनाचे बनावट सोने तारण ठेवत बँकेकडून एकूण ३४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

सोन्याचे मुल्यांकन करणाऱ्या बँकेच्या अधिकृत सोनारासोबत संगनमत करून या सर्वांनी फसवणूक केली आहे. त्यामुळे कामोठे पोलिसांनी बँकेच्या मुख्य कार्यकरी अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पाच ग्राहकांसह सोन्याचे मुल्यांकन करणारा सोनार तसेच बँकेचा तत्कालीन व्यवस्थापक या सर्वांविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

कामोठे येथील दि सह्याद्री सहकारी बँकेमार्फत गोल्ड लोनसह विविध प्रकारची कर्ज दिले जात असून गोल्ड लोनसाठी येणाऱ्या कर्जदारांच्या सोन्याचे मुल्यांकन आणि तपासणी अरविंद अमृते नामक सोनार करून देत होता. त्यानुसार बँकेचे व्यवस्थापक ग्राहकांना सोने तारण कर्ज मंजूर करत होते. बँकेतील खातेदार असलेली मिनाक्षी भोईटे या महिलेने २०१८ मध्ये २९९ ग्रॅम ६५० मिलीग्रॅम वजनाचे सोने तारण ठेवून बँकेकडून नऊ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते, मात्र ही महिला कर्जाची रक्कम भरत नसल्याने बँकेच्या अधिकाऱ्यांनी भोईटे हिने तारण ठेवलेल्या सोन्याचे दुसऱ्या सोनाराकडून तपासणी केली असता, ते बनावट असल्याचे आढळून आले. त्यानंतर अरविंद अमृते याने सोन्याचे मुल्यांकन केलेल्या आणि कर्ज भरत नसलेल्या खातेदारांची माहिती काढली. ग्राहकांनी तारण ठेवलेल्या सोन्याची दुसऱ्या सोनाराकडून तपासणी करून घेतली असता ते सोनेदेखील बनावट असल्याचे आढळून आले. अशा पध्दतीने पाच ग्राहकांनी बँकेच्या अधिकृत सोनारासोबत संगनमत करून बँकेत एक किलो १९९ ग्रॅम ४०० मिलीग्रॅम बनावट सोने तारण ठेवून त्याबदल्यात एकूण ३४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक केली. त्यामुळे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश कोरडे यांनी सर्वांविरोधात तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, मिनाक्षी भोईटे, शफी अजीम पटेल, शफी पटेल याची पत्नी शगुप्ता पटेल तसेच वैभव रमाकांत गिरधर त्याचप्रमाणे सचिन रमेश पगडे या सर्वांनी बँकेकडून कर्ज घेतल्याचे आढळून आले आहे.

के. गो. लिमये वाचनालयाची शनिवारी वार्षिक सर्वसाधारण सभा

पनवेल : रामप्रहर वृत्त

येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि. २६) सायंकाळी ५.०० वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासदानी या सभेस अवश्य उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सभमध्ये दिवंगत सभासदास श्रद्धांजली वाहणे, मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे. सन २०२०–२०२१ मधील हिशोब तपासनीस यानी प्रमाणित केलेले जमा खर्च व ताळेबंद पत्रक वाचून त्यास मंजूरी देणे. सन २०२२–२०२३ मधील अर्थसंकल्पास मंजूरी देणे. सन २०२२–२०२३ करीता लेखापरीक्षकाची नेमणूक करणे. नवीन योजना मंजूर होईपर्यंत हंगामी कार्यकारणीस मुदतवाढ देणे. अध्यक्षाच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे, असे विषय होणार आहेत.

सभेस हजर असलेल्या सभासदांनी कोरोना नियमचे पालन करणे बंधनकारक राहिल. सभेस येताना संस्थेने दिलेले ओळखपत्र अथवा अन्य ओळखपत्र आणणे आवश्यक आहे, असे अध्यक्ष सुनिता श्रीकांत जोशी यांनी पत्रान्वये सांगितले आहे.

पान १ वरून

चिनी बनावटीचे १२०० ड्रोन जप्त

या १२०० ड्रोनची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत पावणे पाच कोटींच्या घरात आहे. याआधीही जेएनपीटी बंदरात चीनमधून आयात करण्यात आलेल्या १४.११ लाख किमतीचा ३६ ड्रोनचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

देशातील ड्रोनच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून केंद्र सरकारने काही अपवादांसह परदेशी ड्रोनच्या आयातीवर बंदी घातली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत फॉरेन ट्रेड महासंचालनालयाने (डीजीएफटी) गेल्या महिन्यात परदेशी ड्रोनच्या आयातीवर बंदी घालणारी अधिसूचना जारी केली आहे.

देशात आयातीवर बंदी घालण्यात आलेल्या चिनी बनावटीच्या ड्रोनची तस्करी करण्यासाठी तस्करांनी न्हावा शेवा असे सांकेतिक नाव दिले आहे. याच सांकेतिक नावाने या ड्रोनची तस्करी केली जात असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

हुतात्म्यांचे कार्य भावी पिढीपर्यंत नेणे आवश्यक

या वेळी इतिहास संशोधक, अभ्यासक व लेखक चंद्रकांत शहासने यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले व हुतात्मा भाई कोतवाल यांच्या आठवणींना उजाळा दिला.

गीतांजली या सुरेल गीतांच्या कार्यक्रमात नाट्यपद, स्फूर्तिगीत, समूहगीत, पोवाडा, फटका, पाळणे, उखाणे, काव्य सादर झाले. त्यास रसिकांनी दाद दिली.

टाकाऊ कचऱ्यापासून पनवेल सजले

यामध्ये कागदापासूनच्या दुचाकी, चारचाकी गाड्या, बाहुल्या, फुले, तेलाच्या रिकाम्या डब्यांपासून फुलांच्या कुंड्या, निरूपोयगी टायरपासून बसण्याच्या खुर्च्या, जुन्या काचेच्या बाटल्यांपासून लॅम्प, फ्लॉवर पॉटस्, सुतळ्यांपासून शोच्या वस्तू, जुन्या कापडापासून पायपुसण्या अशा अनेक वस्तू तयार केल्या.

महापालिकेने त्या वेळी जाहीर केल्याप्रमाणे त्यातील निवडक वस्तू शहरातील विविध चौकांत बसविल्यामुळे शहराचे सौंदर्य तर वाढलेच, शिवाय नागरिकांनाही टाकाऊ कचऱ्यापासूनसुद्धा टिकाऊ वस्तूंची निर्मिती होऊ शकते हा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला आहे. सुक्या कचऱ्याची स्थानिक पातळीवर विल्हेवाट लावणे शक्य असल्याचेदेखील यामुळे नागरिकांना समजू शकणार आहे.

आंब्यांची आवक वाढणार; बाजारभावही सामान्यांना परवडणार

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रोज सरासरी १४ हजार पेट्यांची आवक होत आहे. होलसेल मार्केटमध्ये ३०० ते १२०० रुपये डझन व किरकोळ मार्केटमध्ये ६०० ते २ हजार रुपये डझन दराने आंबा विकला जात आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात आवक वाढणार असून, बाजारभावही सर्वसामान्यांच्या आवाक्यात येण्याची शक्यता आहे.

रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत हापूसची आवक होत आहे. बुधवारी ३७७ टन हापूस विक्रीसाठी आला. ५ ते ७ डझनच्या पेटीला दोन ते पाच हजार रुपये भाव मिळत आहे. यावर्षी कोकणात हापूसचे उत्पादन चांगले असून, बाजार समितीमध्ये नियमित आवक सुरू झाली आहे.

२० एप्रिलपासून आवक वाढण्याची शक्यता आहे. एप्रिल व मेमध्ये रोज ५० हजार पेट्यांपेक्षा जास्त आवक होण्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. हापूसची निर्यातही सुरू झाली आहे. आखाती व इतर देशांमध्ये हापूसला मोठी मागणी आहे. यावर्षी हंगाम चांगला होईल, असा अंदाजही व्यक्त केला जात आहे.

दुखवटा

मॉरेश फर्नांडीस

उरण : बालई रोड येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते मॉरेश झुजिन

फर्नांडीस (वय ७४) यांचे शनिवारी (दि. १२) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मेरी, दोन मुलगे व्हिक्टर आणि झुजिन, दोन मुली जसिंत्ता आणि आयडा व नातवंडे असा मोठा परिवार आहे. मॉरेश फर्नांडीस यांचा जनसंपर्क मोठा होता. समाजातील प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहत असल्याने ते सर्वांच्या परिचयाचे होते. समाज बांधव, मित्र परिवार, पत्रकार, ज्येष्ठ मंडळी, प्रतिष्ठीत मंडळी यांनी फर्नांडीस यांच्या निवासी जाऊन तर काहींनी मोबाइलद्वारे फर्नांडीस परिवाराचे सांत्वन केले.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २१ मार्च २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

हवामान बदलामुळे नागरिक हैराण

पनवेल : रामप्रहर वृत्त

अलिकडच्या काळात हवामान सतत बदलत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून आजारपणात वाढ झाली आहे. पूर्वी ऋतूमानानुसार हवामान ठरलेले असे. हल्ली मात्र निसर्गाचे चक्रच बदलले आहे. वर्षाच्या बाराही महिने कुठे ना कुठे पाऊस पडत असतो. सध्या कडक ऊन्हाळा सुरू झाला आहे. यंदा तापमानाचा पारा ४०च्या वर गेला असून भयंकर उकाड्यामुळे लोक हैराण झाले आहेत.

उष्णतेची लाट सुरू असतानाच हवामानाने अचानक कूस बदलली आणि काही भागांत जलधारा बरसल्या. अंदमान निकोबार व बंगालचा उपसागर या भागातील हवामान बदलामुळे त्या समुद्रकिनारी भागात वादळसदृश्य परिस्थिती उद्भवण्याचा धोका हवामान खात्याने वर्तविला आहे. कोकणात कोठेही चक्रीवादळाचा धोका नाही, पण रविवारी सकाळी हवामान ढगाळ होते. त्यामुळे सूर्यदर्शन उशिरा झाले. त्यानंतर मात्र पुन्हा ऊन्हाचा कडाका सुरू झाला. सततच्या बदलत्या हवानामानामुळे लोक त्रस्त झाले आहेत.

आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन

गेल्या आठवडाभरापासून उन्हाचा तडाखा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा उष्णतेत अंगाची होणारी काहिली कमी करण्यासाठी अनेक जण ऊसाचा रस, लिंबू सरबत, कैरीचे पन्हे, शहाळे असे अनेक पर्याय निवडतात. काहींना थंडगार पेयांचा, आईसक्रीमचा मोहदेखील अनावर होतो, परंतु या थंड पदार्थांचा शरीरावर परिणाम होतो. बदलत्या वातावरणामुळे अनेक आजारांचा धोका बळावतो. त्यामुळे आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य तज्ञ करीत आहेत.

'गरिबांचा फ्रीज' बाजारात दाखल

उन्हाच्या झळा चांगल्या जाणवू लागल्या आहेत. नागरिकांना थंड पाण्याची गरज भासू लागली आहे. दर वर्षीप्रमाणे गरिबांचा फ्रीज म्हणून ओळखला जाणारा माठ बाजारात दाखल झाला असून, यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत दुपटीने वाढ झाली आहे. तरीही यंदा माठांच्या किमती स्थिर असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. सर्वांत लहान माठ १०० रुपये, मध्यम माठ २०० ते २५० रुपये व मोठा माठ ३०० ते ४०० रुपयांचा मिळत आहे.

थंडगार ताडगोळे, कलिंगडांना मागणी

पनवेल : आरोग्यावर कोणताही दुष्परिणाम न करणाऱ्या आणि शरीराचा दाह कमी करणाऱ्या ताडगोळ्यांचा पर्याय स्वीकारला जातो. सध्या हेच ताडगोळे पनवेलमधील रस्त्यारस्त्यांवर दिसत असून नागरिकांची पावले हे ताडगोळे खरेदीसाठी वळत आहेत. ताडाच्या झाडावरून ताडफळ काढून ते ताडमालकाकडून विकत घेतले जातात. त्यानंतर हे फळ फोडून ताडगोळ्यांची विक्री केली जाते. त्याचबरोबर रसरशीत, गारेगार कलिंगडांनाही मोठी मागणी आहे. चौका-चौकात कलिंगड विक्रेते फळाची विक्री करीत आहेत.

नवी मुंबई लवकरच 'सीसीटीव्ही'च्या नजरेत

आठ महिन्यांत सर्वत्र कॅमेरे; कंपनीकडून कामाला सुरुवात

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

नवी मुंबई महापालिकेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला अखेर सुरुवात झाली असून पुढील आठ महिन्यांत संपूर्ण शहर १५०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरेत येणार आहे. या कामी आमदार मंदा म्हात्रे यांनी प्रयत्न केले होते.

सीसीटीव्हीच्या १५४ कोटींच्या कामासाठी २७४ कोटींची निविदा आधी आली होती. त्यामुळे पालिका आयुक्तांनी ती निविदा प्रक्रियाच रद्द करून नव्याने या कामासाठी निविदा मागवली. त्यामध्ये वजा ७.०४ कमी दराने निविदा स्वीकृती केल्यामुळे पालिकेचा अंदाजे २० कोटींचा फायदा होणार आहे. संबंधित ठेकेदाराला नऊ महिन्यांची कामाची मुदत देण्यात आली असून २१ नोव्हेंबर २०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे.

मेसर्स टाटा ॲडव्हान्स सिस्टीम लिमिटेडकडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली असून पोलिसांसमवेत साइड सर्व्हे सुरू केल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्याचबरोबर हीच कंपनी पुढील पाच वर्षे या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीचेही काम केले जाणार आहे. सध्या शहरातील २८२ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, परंतु शहरातील सर्वच महत्त्वाच्या ठिकाणी १५० कोटी रुपये खर्चातून अत्याधुनिक पद्धतीने शहर तिसऱ्या डोळ्याच्या नजरेत आणणार असून त्यासाठीची सुरुवात झाली आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिका व्याप्त हद्दीतील महत्त्वाची निवडक ठिकाणे, नवी मुंबई शहरातील प्रवेशद्वारे, मुख्य चौक, मार्केट, बस डेपो, रेल्वे स्थानकांबाहेरील परिसर तसेच शहरातील वर्दळीच्या ठिकाणी देखरेखीसाठी शहरातील मुख्य रस्ते या ठिकाणी पालिकेने २०१२ रोजी २८२ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत, परंतु आयटी उपकरणे यांचे आयुर्मान पाच वर्षे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे शहरात १५०० अत्याधुनिक नवीन कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.

याबाबतचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून लालफितीत व दरांवरून अडखळत पडला होता. नवी मुंबई शहरात प्रवेश करण्यात येणाऱ्या ऐरोली मुलुंड उड्डाणपूल, ठाणे दिघा रोड, शिळफाटा जंक्शन, वाशी टोल नाका, बेलापूर किल्ले गावठाण व बेलपाडा अशा सर्वच प्रवेशद्वारांवर तसेच वाहतूक नियंत्रणासाठी कॅमेरे लावण्यात येणार आहेत. शहरासाठी महत्त्वाच्या असलेल्या कामांत शहराच्या प्रत्येक प्रवेश निर्गमन जागेवर हाय डेफिनेशन फिक्स व हायस्पीड कॅमेरे लावण्यात येणार आहेत. तसेच शहरात येणाऱ्या वाहनाबाबतची माहिती ठेवण्यासाठी स्वयंचलित पद्धतीने नंबर प्लेट वाचण्यासाठी एएनपीआर कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच शहरातील २७ मुख्य चौकांसाठी १०८ कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे सर्व बस डेपो, मार्केट, उद्याने, मैदाने, पालिका कार्यालये, वर्दळीची ठिकाणे, चौक, नाके, मर्मस्थळे ही सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कक्षेत येणार आहेत.

शहरातील वर्दळीचे पामबीच मार्ग, ठाणे बेलापूर रोड, पालिका हद्दीतील सायन-पनवेल महामार्ग येथे हायस्पीड कॅमेरे लावण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे शहरातील ४३ ठिकाणी पॅनिक अलार्म व कॉलबॉक्सची सोय असणार आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या मागणीनुसार देशविघातक व घातपात कृत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी खाडी व समुद्रकिनारे अशा नऊ ठिकाणी थर्मल कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. आठ ठिकाणी स्थानिक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत तसेच नवी मुंबई महापालिका मुख्यालय केंद्रीय नियंत्रण कक्ष पोलीस आयुक्तालय यांच्याशी जोडण्यात येणार आहे. या कामाचे डेटा सेंटर पोलीस मुख्यालय असेल तसेच ते पालिकेकडेही स्थापित करण्यात येणार आहे.

वाहनचालकांवर 'वॉच' ठेवण्यासाठी ९६ कॅमेरे

रेड लाइट व्हायलेन्सन म्हणजेच सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांवर नजर ठेवण्यासाठी देखरेखीसाठी ९६ कॅमेरे असणार आहेत. त्यामुळे नागरिकांनाही वाहतूक नियमांच्या शिस्तीचे पालन करावे लागणार आहेत.

"या कामासाठीचा कार्यादेश दिला असून पुढील नऊ महिन्यांत संपूर्ण शहर सीसीटीव्हीच्या नजरेत येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण काम होणार आहे. तसेच १५४ कोटींच्या कामासाठी २७४ कोटींपर्यंत निविदा आल्याने ती निविदा प्रक्रियाच रद्द केली. नव्याने दिलेल्या कामात १२७ कोटींत काम होणार असून पालिकेचे कित्येक कोटींची बचत होणार आहे.

-अभिजित बांगर,
आयुक्त, नवी मुंबई महापालिका

१२ ते १४ वयोगटातील मुला-मुलींचे लसीकरण वेगवान करण्याचा प्रयत्न

नवी मुंबई पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची माहिती

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १२ ते १४ वयोगटांतील लसीकरणास १६ मार्चपासून प्रारंभ झाला. या वयोगटातील मुलामुलींचेही वेगवान लसीकरण करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

१६ मार्चपासून सुरू झालेल्या लसीकरणाला पालकांकडून अल्प प्रतिसाद मिळाला आहे, परंतु शहरातील केंद्र वाढवल्यानंतर वेगवान लसीकरण करता येणार आहे. पहिल्या दिवशी कोविन पोर्टलचा गोंधळ होता. परंतु पालिकेने दुसऱ्याच दिवसापासून सर्व वयोगटांतील लसीकरणाप्रमाणे १२ ते १४ वयोगटातील लसीकरणही सकाळी ९ ते ५ वेळात सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे पालिकेची आता पुढील आठवड्यात जास्तीत जास्त केंद्रे वाढवण्यात येणार आहेत.

नवी मुंबई महापालिकेने सुरुवातीपासूनच लसीकरणाच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य नियोजन केल्यामुळे १८ वर्षांवरील वयाच्या लसीकरणाचे पहिल्या व दुसऱ्या डोसचे १०० टक्के उद्दिष्ट गाठणारी नवी मुंबई महानगरपालिकाही राज्यातील पहिली महापालिका ठरली आहे. १५ ते १८ वयोगटातील लसीकरणातही पालिकेने पहिल्या डोसचे १०० टक्के लसीकरण पूर्ण केले आहे. त्यामुळे या वयोगटातील लसीकरण करण्यासाठी पालिकेने नियोजन केले आहे.

नवी मुंबईत पुढील आठवड़यात १२ ते १४ वयोगटांतील लसीकरण केंद्रे वाढवण्यात येणार आहेत. पालिकेच्या रुग्णालयाबरोबरच २३ नागरी आरोग्य केंद्रे व शाळांमध्येही लसीकरण केंद्रे सुरू करण्याचे नियोजन आहे. या वयोगटातील लसमात्राही अधिक प्राप्त करण्यासाठी पालिका प्रयत्नशील आहे, असे पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.

नागरी समस्यांचे निवारण करा

भाजपच्या पांडुरंग आमले यांची मागणी

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

महापालिका प्रभाग ७६ मधील नागरी समस्यांचे निवारण करण्याची मागणी सानपाडा नोडमधील भाजपचे युवा नेते पांडुरंग आमले यांनी एका लेखी निवेदनातून महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली आहे.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात आमले यांनी पावसाळा येण्यास आता अवघा अडीच महिन्याचा कालावधी राहीला आहे. प्रभाग ७६ मधील सानपाडा सेक्टर २,३,४.८ या परिसरात पावसाळी कामे लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावीत. ज्या ज्या ठिकाणी रस्त्यावर खोदकाम केले असेल, त्या ठिकाणी रस्त्यांची डागडूजी तसेच सपाटीकरण करण्यात यावे. विभागातील सर्व गटारांची तळापासून सफाई करण्यात यावी. सानपाडा सेक्टर २,३,४,८ परिसरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये बाहेरूनच नाही तर अंर्तगत भागातही सातत्याने धुरीकरण करून डास निर्मूलन मोहीम राबविण्यात यावी. याशिवाय परिसरातील गटारांमध्ये जंतुनाशक फवारणी करण्यात यावी. विभागातील डास नियत्रंणात आल्यास साथीचे आजार नियत्रंणात येवून त्यावर मात करणे शक्य होईल असे म्हटले आहे.

प्रभाग ७६ मधील सानपाडा सेक्टर २,३,४,८ मधील गटारांची तळापासून सफाई मोहीम राबवावी आणि साथीचे आजार नियत्रंणात आणण्यासाठी डास निर्मूलन मोहीम राबवावी यासाठी संबंधितांना निर्देश देण्याची मागणी आमले यांनी निवेदनाद्रारे केली आहे.

नवीन पनवेलमध्ये साहित्य वसंतोत्सव

नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त

साहित्य साधना या समूहाच्या वतीने साहित्य वसंतोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवीन पनवेलमधील सिडको उद्यानातील खुल्या रंगमंचावर हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला सिंधुदुर्ग रहिवासी संघाचे अध्यक्ष केशव राणे व पदाधिकारी तसेच रॉयल एज्युकेशन असोसिएशनच्या संस्थापक नाजनीन पालेकर, जाकीर पालेकर, नवीन पनवेल ब्राह्मण सभेच्या अध्यक्ष दिपाली जोशी, सचिव मंजुषा भावे आदी उपस्थित होते.

समूहाचे प्रवर्तक शंकर आपटे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम झाला. यामध्ये स्व. लता मंगेशकर व सिंधुताई सकपाळ यांना शब्दसुमनांजली, व्यक्तिचित्रण, कथा, अलक, ललित, कविता, विडंबनगीत अशा अनेक साहित्यकृतींचे सादरीकरण ज्येष्ठ आणि नवोदित साहित्यप्रेमीनी केले. शंकर आपटे व वरदा जोशी यांनी निवेदन केले. शेखर अंबेकर, तुषार दानवे, सुजाता कुलकर्णी, अपर्णा साठे आदींनी कार्यक्रमासाठी योगदान दिले. माधव भागवत याने गायकांना तबलासाथ केली.

सत्याग्रह महाविद्यालयात सत्याग्रह सप्ताह

उद्या पदवीदान समारंभ

नवी मुंबई : प्रतिनिधी

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या आजी माजी विद्यार्थ्यांचा सत्याग्रह सप्ताह सुरू आहे. यात जाहीर परिसंवाद, व्याख्यानमाला, एक शाम सत्याग्रह के नाम आदी समारंभात सुरू आहे. रविवारी (दि. २०) सकाळी सीबीडी येथील सम्राट अशोक महाविहारातून महाड येथील चवदार तळे येथे सत्याग्रह ज्योत घेऊन उपासक सुंदर वसावे, गोविंद बनसोडे, एम. एल. सूर्यवंशी यासह अनुयायांनी प्रस्थान केले. मंगळवारी (दि. २२) दुपारी ३ वाजता खारघर येथील शांताराम रामराव सभागृहात पदवीदान समारंभ होणार आहे.

सत्याग्रह सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर महाडचा धर्म संगर आणि हिंदूंची परिवर्तनवादी भूमिका यावर परिसंवाद झाला. प्रो. संगीता जोगदंड, विकास मोरे, संदीप गोयंका यांनी या वेळी आपले विचार मांडले.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरायांचे ज्वलंत विचार देशाला महाशक्तिशाली बनविणारे आहेत. संविधानिक हक्क आणि त्यासाठीचा लढा यापुढच्या काळात लढण्याची शपथ नवतरुणांनी घ्यावी. महाराष्ट्र शासनाच्या कोकण विभागीय समाजकल्याण उपायुक्त वंदना कोचुरे यांनी संविधान स्तंभ पायाभरणी केली. अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. प्रतिभा शंकरराव यांनीही आपले विचार मांडले.

सत्याग्रह महाविद्यालय, सिद्धार्थ शाळा आणि नवी मुंबईतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एम. एल. सूर्यवंशी, वनिता सूर्यवंशी यांनी या वेळी मोलाचे सहकार्य केले.

खारघरमध्ये शाश्वत फाउंडेशनतर्फे होळी मिलन आणि हास्य कविसंमेलन

पनवेल : प्रतिनिधी

होळी निमित्त खारघर येथे शनिवारी शाश्वत फाउंडेशन आयोजित होळी मिलन आणि हास्य कविसंमेलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी कवींनी आपल्या विनोदी कवितातून पर्यावरण जागृतीचा संदेश उपस्थितांना दिला.

खारघर सेक्टर १९मध्ये शाश्वत फाउंडेशनच्या बिना गोगरी व जयेश गोगरी यांनी शनिवारी (दि. १९) सायंकाळी होळीनिमित्त होली मिलन आणि हास्य कविसंमेलन आयोजित केले होते. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह विठ्ठलराव कांबळे, भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, भाजप महाराष्ट्र प्रदेश युवा मोर्चा अध्यक्ष विक्रांत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वेळी कवि जय प्रकाश त्रिपाठी, अरविंद शर्म राही, सुनील सावंरा, प्रेमलता त्रिपाठी आणि डॉ. मुकेश गौतम यांनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांना हसवताना त्यांना पर्यावरणाबाबत जागृत राहण्याचा संदेश दिला. डॉ. भावना सिंह यांचे सूत्र संचालनाला ही रसिकांना भरपूर दाद दिली.

या कार्यक्रमाला उद्योजक प्रमोद चौधरी, ललित चौधरी, नेटिव्ह फ्रेश मिल्कचे विलास लांडगे, पंकज पटेल, रामजी बेरा, अभिमन्यु पाटील, वासुदेव पाटील, प्रवीण पाटील, अंबालाल पटेल, विजय मालंडकर, किरण पाटील आदींचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व शाश्वत फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वी झाला.

गाड्यांवर 'पोलीस' पाटी लावल्यास सावधान!

खासगी वाहनांवर होणार शिस्तभंगाची कारवाई

पनवेल : रामप्रहर वृत्त

पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे नातेवाईक त्यांच्या खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी पाटी लावतात. तसेच पोलिसांचे चिन्ह असलेले स्टिकर लावून गाड्या चालवतात. हा प्रकार तत्काळ बंद करून खासगी वाहनांवर अशा प्रकारची कोणतीही पाटी अथवा स्टिकर लावू नका. अन्यथा संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असा इशारा देण्यात आला आहे.

पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे नातेवाईक त्यांच्या खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी लाल रंगाची पाटी लावतात अथवा पोलिसांचे स्टिकर लावून गाड्या चालवत असल्याने त्याविरोधात अनेक तक्रारी वरिष्ठांकडे

येत होत्या. याबाबत उच्च न्यायालयाने देखील नाराजी व्यक्त करून संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

ज्या अधिकारी, अंमलदार किंवा त्यांच्या नातेवाईकांनी खासगी वाहनावर पोलीस पाटी लावली असेल तर ती यापुढे लावू नये. तसेच जर कोणी गाडीवर पोलीस पाटी, स्टिकर लावलेले सापडले तर संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, असे आदेश सर्व प्रभारी पोलीस निरीक्षकांना देण्यात आले आहेत.

पोलीस पाटीचा होऊ शकतो गैरवापर

सर्व नागरिकांना समान कायदा या तत्त्वानुसार पोलिसांनीच कायद्याचे उल्लंघन करणे पोलिसांची प्रतिमा मलीन करण्यासारखे आहे. 'पोलीस' पाटी लावलेली वाहने नाकाबंदी तसेच सुरक्षा तपासणी न होता सोडली जाण्याची शक्यता असते. पोलीस पाटीचा वापर करून घातपात घडविला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उरणमध्ये महिला स्नेहसंमेलन

उरण : वार्ताहर

परमार्थ सेवा संस्था उरणच्या वतीने शुक्रवारी (दि. १८) रोजी शिवम अपार्टमेंट येथे सायंकाळी ४ ते ७ या वेळेत परमार्थ सेवा संस्थेच्या उरणच्या अध्यक्ष ॲड. डिम्पल गुर्जर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला स्नेहसंमेलन कार्यक्रम झाला. सुमारे २००हून अधिक महिलांनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारती दीदी यांनी भूषविले होते. नारी नरकद्वार नही स्वर्ग का द्वार है या संदेश सोबत विषयावर भारती दीदी मोलाचे मार्गदर्शन केले. महिला सक्षमीकरण या विषयावर परमार्थ सेवा संस्था उरण च्या अध्यक्षा ॲड. डिम्पल लक्ष्मण गुर्जर यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात महिलांसाठी मनोरंजन खेळ, भजन, नृत्य, गीत आदींचा समावेश होता. खेळांच्या स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या महिलांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सन्मान चिन्ह, सन्मान वस्त्र देऊन गौरविण्यात आले. प्रत्येक खेळात तीन बक्षिसे देण्यांत आली. या वेळी कैलास जैन, हिर्देश गौर, महिला वर्ग, प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्वरीय विश्व विद्यालय उरण सेंटरच्या सर्व बहेन आदी उपस्थित होत्या.

राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १३

अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

१. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९ पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?
अ.) १२ कोटी ***ब.)*** ५ कोटी ***क.)*** ८ कोटी ***ड.)*** १० कोटी

२. भारतीय पासपोर्टधारक जगातील किती देशांना आता व्हिसाशिवाय भेट देऊ शकतात?
अ.) ५९ देश ***ब.)*** ४० देश ***क.)*** ३० देश ***ड.)*** १० देश

३. आधार कार्डधारक नागरिकांची संख्या सध्या (फेब्रुवारी २०२२) किती आहे?
अ.) १४० कोटी ***ब.)*** १२० कोटी ***क.)*** १३२ कोटी ***ड.)*** १०० कोटी

टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!

संपादकीय

अंगार आणि भंगार

एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष खासदार इम्तियाज जलील यांनी महाविकास आघाडीसमोर दोस्तीचा हात पुढे केला आणि नव्याच वादाला तोंड फुटले. महाविकास आघाडीत सामील होण्याच्या एमआयएमच्या ऑफरमुळे शिवसेनेच्या प्रतिमेला तडा जायचा तो गेलाच. पूर्वीच्या काळी एमआयएमची अशी हिंमत तरी झाली असती का? या एकाच प्रश्नाचे उत्तर शिवसेनेच्या नेत्यांनी स्वत:लाच प्रामाणिकपणे द्यावे. अंगार कोण आणि भंगार कोण या प्रश्नाचे उत्तरही तेव्हाच मिळून जाईल.

शिमग्याचा मुहुर्त साधून राजकारणात आता नवे कवित्व सुरू झालेले दिसते. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष कुठल्या न कुठल्या कारणाने भारतीय जनता पक्षावर तोंडसुख घेण्याची एकही संधी सोडत नाहीत आणि आघाडी सरकारातील तोंडाळ नेत्यांना सळो की पळो करण्याचे धोरण भाजपनेदेखील हातातून सोडलेले नाही. खरेतर या दररोजच्या दळणाचा सामान्य नागरिकांना एव्हाना कंटाळाच आला असेल. गेल्या २८ महिन्यांमध्ये जनसामान्यांच्या हिताचे एकही काम झालेले दिसत नाही. महाराष्ट्राच्या हिताचा एकही निर्णय महाविकास आघाडीचे सरकार आजवर घेऊ शकलेले नाही. बळकावलेल्या खुर्च्यांचा बचाव करणे आणि भाजपवर तोंडसुख घेणे एवढाच दोन कलमी कार्यक्रम सध्या सुरू असल्याने सामान्यजनांना त्याचा कंटाळा येणे साहजिकच आहे. भारतीय जनता पक्षाला रोखायचे असेल तर समविचारी पक्षांनी एकत्र येऊन मोर्चेबांधणी करायला हवी. त्याखातर आम्ही महाविकास आघाडीत येऊ शकतो अशा प्रकारचा अनौपचारिक प्रस्ताव एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष व औरंगाबादचे खासदार इम्तियाज जलील यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्यासमोर ठेवला. त्यांनी तो आपल्या पक्षश्रेष्ठींकडे पोहचवला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातून जलील यांच्या प्रस्तावाला काहीसा सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्यासारखे वाटल्याने प्रकरण पेटले आणि महाविकास आघाडीतील वैचारिक दुफळी उघडकीस आली. काँग्रेसने निराळाच पवित्रा घेतला. एमआयएम हा धर्मांध पक्ष असल्याकारणाने त्यांच्याशी हातमिळवणी होऊ शकत नाही असा खुलासा काँग्रेसतर्फे करण्यात आला, तर सर्वांत जास्त मिरच्या झोंबल्या त्या शिवसेनेला. औरंगजेबाच्या कबरीसमोर नतमस्तक होणाऱ्यांशी हातमिळवणी होणे मंजूर नसल्याची ग्वाही शिवसेनेचे प्रवक्ता संजय राऊत यांनी दिली खरी, पण या सगळ्या प्रकरणात शिवसेनेची दुटप्पी भूमिका पुन्हा एकदा उजेडात आली. तसे बघायला गेले तर सध्याची शिवसेना ही शिवसेनाच उरलेली नाही असे म्हणावे लागेल. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना हिंदुत्वाचा कडवा पुरस्कार करणारी दमदार संघटना होती. सध्याची शिवसेना मात्र राष्ट्रवादी आणि काँग्रेससारख्या पारंपरिक विरोधकांच्या मांडीला मांडी लावून सत्तेत बसलेली आहे. जिच्या नावाने एकेकाळी हिंदू संघटनांचा आवाज दुमदुमत असे ती शिवसेना अजानच्या स्पर्धा घेऊ लागली आहे. शिवसेनेने आता शिवसेनाप्रमुखांच्या नावापुढे जनाबही स्वीकारले आहे, मात्र तशी टीका होताच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आम्हाला जनाब म्हणणारी भाजप स्वत:च हिजबुल सेना आहे असा टोला लगावला, परंतु हा टोला कुचकामी आहे. भारतीय जनता पक्षाचे हिंदूत्व राजकारणापुरते मर्यादित असून शिवसेना हा हिंदुत्वाचा अंगार आहे असे उद्धव ठाकरे म्हणतात, मात्र त्यात तथ्य उरलेले नाही हे सारेच जाणतात. भाजपचे हिंदूत्व राजकारणापुरते आहे की अस्सल आहे याचे उत्तर भारतीय मतदारांनी यापूर्वीच दिले आहे. हिंदुत्वासाठी भाजपने आजवर किती किंमत मोजली आहे हे वेगळे सांगावयाची गरज नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून शेकापची कोंडी

खबरबात
संतोष पेरणे

आगामी काळात रायगड जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ घातल्या आहेत. जिल्हा परिषद आपल्या हातात असावी, यासाठी सर्वच राजकीय पक्ष मोर्चेबांधणी करीत आहेत. सध्या जिल्ह्यात कोणताही एक पक्ष स्वबळावर सत्ता काबिज करू शकत नाही, अशी राजकीय स्थिती असताना जिल्हा परिषदेमधील सत्ताधारी शेतकरी कामगार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात एकमत नाही असे दिसून येत आहे.

शेकापची शिवसेनेसोबत वाढत चाललेली गट्टी यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आपला सत्ताधारी मित्र शेकाप हा जिल्ह्यात शिवसेनेच्या जवळ जाणार नाही, याची काळजी घेताना दिसत होता. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटनासाठी जिल्ह्याच्या पालकमंत्री कर्जत तालुक्यात आल्या. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने सर्व विकासकामांचा निधी आपल्याच पक्षाच्या माध्यमातून आला आहे असे भासवत निमंत्रण पत्रिका बनवली आणि त्यातून शेतकरी कामगार पक्षाला हद्दपार केले. त्यात कर्जत विधानसभा मतदारसंघात शेकापकडून शिवसेनेसोबत छुपी चर्चा केली जात असल्याचे सातत्याने बोलले जाते. त्यामुळे जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाची कोंडी करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेस करताना दिसत आहे.

पाच वर्षांपूर्वी रायगड जिल्हा परिषदेत शेतकरी कामगार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने सर्वाधिक जागा जिंकत सत्ता काबिज केली. त्यानंतर सध्याच्या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आणि २०१९मध्ये विधानसभा निवडणूक लढवीत विधानसभेत प्रवेश केला. मात्र त्याच विधानसभा निवडणुकीत शेकापला विद्यमान दोन्ही जागांवर पराभव पत्करावा लागला आणि त्या वेळी शेकाप-राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दरी निर्माण झाली. जिल्हा परिषदेची सत्ता विरोधकांच्या हाती देऊन जमणार नाही म्हणून शेकाप-राष्ट्रवादी एकत्र आले, पण विषय समित्यांवरून राष्ट्रवादी आणि शेकापमधील धुसफूस सर्वांनी पाहिली आहे. आता मागील वर्षभर शेकाप जिल्ह्यातील काही तालुक्यात शिवसेनेसोबत जवळीक साधत असल्याचे दिसून येत होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चलबिचल सुरू झाली. शेवटी राष्ट्रवादी काँग्रेसची मनधरणी आदर्श शिक्षक पुरस्काराच्या निमित्ताने मान्य केली आणि कर्जतमधील एका रिसॉर्टवर शेकाप-राष्ट्रवादीचे जिल्ह्यातील नेते एकत्र आले. पण शेकाप जिल्ह्यात शिवसेनेसोबत जाऊ शकतो अशी भीती पुन्हा निर्माण झाली आहे.

रायगड जिल्हा परिषदेमध्ये शेकापचे २३ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे १२ सदस्य असून सदस्य मंडळात सत्तेत या दोन्ही पक्षांचा समान वाटा आहे. त्यामुळे कोणत्याही विकासकामांची उद्घाटनेही दोन्ही पक्ष एकत्रित येऊन करीत असतात. मात्र २० मार्च रोजी रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या विकासकामांचा उद्घाटन सोहळा राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केला. त्यासाठी तयार केलेल्या निमंत्रण पत्रिकेवर 'सबकुछ राष्ट्रवादी काँग्रेस' अशी परिस्थिती आहे.

या पत्रिकेत शेतकरी कामगार पक्षाच्या या तालुक्यातील पदाधिकारी तसेच दोन्ही जिल्हा परिषद सदस्यांच्या नावाचा उल्लेख देखील नाही. त्यामुळे ही जंत्री रायगड जिल्ह्यातील आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आघाडीमध्ये अडथळा ठरू शकते. कर्जत तालुक्यातील बीड बुद्रुक, पाथरज, खांडस, सावेळे, नेरळ आणि उमरोली या सहापैकी केवळ जिल्हा परिषद गटामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य आहेत. तर शेकापचे दोन सदस्य आहेत. या सर्व प्रभागात विकासकामांची भूमिपूजने केली जात असताना त्या कार्यक्रमाला अन्य पक्षातील कोणत्याही सदस्याचे नाव निमंत्रण पत्रिकेत नाहीत. त्यामुळे ते सर्व कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सुरू असल्याची चर्चा सध्या रंगली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचा मित्रपक्ष असलेल्या शेकापला कर्जत तालुक्यातील विकासकामांच्या जंबो सोहळ्याला साधे निमंत्रण नाही. शिवसेनेच्या जिल्हा परिषद सदस्या या जिल्हा परिषदेमध्ये सत्तेत राहिलेल्या आघाडीमधील घटक पक्ष नव्हता. मात्र जे दोन पक्ष राष्ट्रवादीची सदस्य संख्या कमी असून पाच वर्षे सत्तेचा संसार करून तो पूर्णत्वाला नेला गेला आहे अशा आघाडीमधील अन्य दोन पक्षांना राष्ट्रवादी काँग्रेस जाणीवपूर्वक लांब ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे काय? याबद्दल देखील दबक्या आवाजात चर्चा सुरु झाली आहे.

शेकाप जिल्हा परिषदेमधील क्रमांक एकचा पक्ष असून देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २० मार्च रोजी मुदत संपत असलेल्या जिल्हा परिषदेमधील सत्ताधारी शेकापला दूर ठेवत आहे. याचा बोध राजकीय वर्तुळात महत्त्वाचा समजला जात आहे. कारण पाच वर्षे या दोन्ही सत्ताधाऱ्यांनी सत्ता राबविली पण पाच वर्षांचा शेवट असलेल्या २० मार्च या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शेकापला दूर ठेवण्याची भूमिका जाणीवपूर्वक की नजरचुकीने झाली? याचे उत्तर नजीकच्या काळात मिळणार आहे. मात्र नेरळ-ममदापुर संकुलामध्ये विकासकामे करताना ती नक्की राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून झाली की, शेतकरी कामगार पक्षाच्या कोट्यातून अशी चर्चा त्या त्या कामांच्या भूमिपूजन कार्यक्रमात झाली आहे. त्यामुळे नेरळ प्राधिकरणावर आगामी काळात वर्चस्व मिळवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धडपड सुरू आहे की, आपल्या मित्राला शेकापला डिवचण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेस करीत आहे काय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

या विकासकामांची उद्घाटने आणि भूमिपूजने रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे, जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे आणि जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड यांच्या उपस्थितीत झाल्याने जिल्ह्यात आगामी काळात शेकाप दूर ठेवण्याची रणनिती तर बनविली गेली नाही ना? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस सुनील तटकरे यांना राज्यात तीन पक्षांच्या आघाडीची सत्ता कायम राहावी असे वाटत आहे. खालापूर नगरपंचायतीमध्येही शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेत थेट उपनगराध्यक्ष पद देऊन जिल्ह्यात कोणत्याही पक्षाची आघाडी-युती होऊ शकते असे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सदस्य मंडळाची मुदत संपत असताना राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केलेल्या विकासकामांच्या उद्घाटन सोहळ्याला शेकापच्या नेत्यांना आणि सदस्यांना मुद्दाम डावलले असे बोलले जात आहे. आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे दोन पक्ष देखील एकत्र आल्यास नवल वाटायला नको.

रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाची ताकद लक्षात घेता शेकापशिवाय किमान रायगड जिल्हा परिषदेमध्ये तरी सत्ता मिळविणे शक्य नाही अशी राजकीय स्थिती आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडून शेकापला जाणीवपूर्वक डावलले की, शेकापला खिजवण्याचा प्रयत्न करीत आहे हे येणारा काळ ठरविणार आहे. रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि शेकाप यांची तोंडे वेगवेगळ्या दिशेला असल्याने राज्यातील महाविकास आघाडीचा प्रयोग रायगड जिल्ह्यात राबविला जाणार नाही ना? अशी स्थिती निर्माण झाली आहे. परंतु राष्ट्रवादी स्वतः आक्रमकपणे भूमिका घेऊन आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करीत असेल तर शेकापची कोंडी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने अशी भूमिका घेतली आहे का? याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

नेरळमध्ये सार्वजनिक शिवजयंती उत्सवाला सुरुवात

कर्जत : बातमीदार

नेरळ गावामध्ये गेली ५६ वर्षे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीप्रमाणे साजरी केली जाते. यावर्षी २१ मार्च रोजी शिवजयंती उत्सव असून त्यानिमित्ताने रविवारी (दि.२०) चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून जयंती उत्सवाला सुरुवात झाली.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने शिवजयंती उत्सव सोहळ्याची सुरुवात रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेने झाली. येथील बापूराव धारप सभागृहात आयोजित या दोन्ही स्पर्धांचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध पुतळ्याला समितीचे अध्यक्ष राहुल भाटकर यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

या वेळी उत्सव समितीचे उपाध्यक्ष देवेंद्र दाभणे, प्रथमेश घाटे, सचिव प्रीतम गोरी, हरिष पवार, खजिनदार प्रमोद कराळे, प्रतीक भिसे यांच्यासह कुणाल मनवे, कौस्तुभ गावकर, चिराग गुप्ता, अल्पेश मनवे, सूरज साळवी, परेश भोईर, ओंकार खोलमकर, दुर्वांकुर पवार, हर्ष खडे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. या स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणावर शालेय मुलांनी चित्रकला स्पर्धेसाठी हजेरी लावली होती.

रांगोळी स्पर्धेसाठी महाविद्यालयीन विद्यार्थीनींचा सहभाग होता. श्रेया चंचे हिने स्पर्धेच्या ठिकाणी भेट देऊन स्पर्धकांना काही टिप्स देखील दिल्या. या वेळी श्रेया चंचे हिने काढलेले चित्र कॅनडा देशातील हॉलिवूड अभिनेत्री यांनी खरेदी करून तिच्या चित्रकलेला दाद दिली आहे. स्पर्धेच्या निमित्ताने श्रेया चंचे हिचा सत्कार नेरळ सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आला.

(छाया : संतोष पेरणे)

आरोग्य शिबिरात १७० रुग्णांची तपासणी

या वेळी आरोग्य तपासणी शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या माध्यमातून आयोजित आरोग्य शिबिरात १७० रुग्णांची तपासणी करण्यात आली. डॉ. संतोष पोयेकर, डॉ. अमोल सातव, डॉ. संध्या शुक्ला यांनी सर्व रुग्णांची तपासणी केली. काही रुग्णांच्या शस्त्रक्रिया रायगड हॉस्पिटलकडून मोफत केल्या जाणार आहेत, असे जाहीर करण्यात आले आहे.

(छाया : संजय करडे)

मुरूडमधील जीर्ण इमारत पाडण्यास अखेर सुरुवात

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड नगर परिषदेने २००४ साली बांधलेली प्रियदर्शनी इमारत धोकादायक झाल्याने रविवारी (दि. २०) पाडण्यास अखेर सुरुवात करण्यात आली.

या इमारतीच्या तळ मजल्यावर व्यापाऱ्यांसाठी गाळे तर पहिल्या मजल्यावर विविध समाजसेवी संघटनांसाठी खोल्या उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. येथे व्यायामशाळासुद्धा होती. परंतु इमारतीचा स्लॅब तसेच काँक्रिटच्या असणारा स्लॅब कोसळून लोखंडी सळ्या दिसू लागल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे मुरूड नगर परिषदेने नगरसेवकांचा ठराव घेऊन ही इमारत पाडण्याचा निर्णय घेतला. या इमारतीमधील गाळेधारकांना रितसर नोटीस देऊन गाळे रिकामे करण्यासाठी अवधी देण्यात आला होता. त्यानंतर रविवारपासून इमारत पाडण्याची सुरुवात करण्यात आली आहे.

देवी दर्शन..!

श्रीवर्धन : बोर्लीपंचतन येथील चिंचबादेवी मंदिरात देवीच्या दर्शनासाठी दूरवरून भाविक येत आहेत. (छाया : अमेय नाझरे)

आरोग्य प्रहर

मधुमेहात साखरेची पातळी अशी करा नियंत्रित!

मधुमेह व्यवस्थापन हे सोपे काम नाही. मधुमेह आहाराव्यतिरिक्त, तुमची जीवनशैली देखील खूप महत्त्वाची आहे. जास्त मद्यपान आणि बैठी जीवनशैली यांचाही मधुमेहाचा धोका वाढल्याचे आढळून आले आहे. मधुमेह हा एक जुना, चयापचय रोग आहे जो रक्तातील साखरेची पातळी अनियंत्रित असताना उद्भवतो. तुमचा आहार मधुमेहाच्या व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतो. एक आदर्श मधुमेह आहार हा उच्च फायबरयुक्त पदार्थ, जटिल कर्बोदक आणि प्रथिने यांचे संतुलित मिश्रण असावे. आपल्या आहारात पालेभाज्यांचा समावेश केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत होऊ शकतात.

मधुमेहाच्या रुग्णांनाही त्यांच्यातील कर्बोदकांच्या प्रमाणाची काळजी घ्यावी लागते. अशा परिस्थितीत, फळांमधून तुम्हाला यातील किती कार्ब्स आवश्यक आहेत हे आधीच ठरवा आणि त्यानुसार तुमच्या आहाराचे नियोजन करणे आवश्यक आहे. अभ्यासात असे दिसून आले आहे की, दररोज दीड सर्व्हिंग हिरव्या पालेभाज्या किंवा सलाड पत्ते खाल्ल्याने टाइप २ मधुमेहाचा धोका १४ टक्क्याने कमी होतो.

- **पालक** : पालक ही स्टार्च नसलेली आणि मधुमेहासाठी अनुकूल भाजी आहे जी तुम्ही तुमच्या आहारात समाविष्ट करू शकता. पालकामध्ये फायबर देखील चांगले असते, जे रक्तातील साखरेची पातळी वाढण्यास प्रतिबंध करते. पालकाचा ग्लायसेमिक इंडेक्सही खूप कमी असतो. पॉलिफेनॉल आणि व्हिटॅमिन सी ची उच्च सांद्रता, ज्यात अँटिऑक्सिडंट गुणधर्म आहेत असे मानले जाते, ते रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यात भूमिका बजावतात असे मानले जाते. पालकामध्ये मॅग्नेशियम देखील चांगले असते, ज्यामुळे धोका कमी होतो.
- **फुलकोबी** : फुलकोबीतील उच्च फायबर सामग्री मधुमेहामध्ये रक्त स्थिर ठेवण्यास मदत करू शकते. स्वयंपाक करण्यापूर्वी कोबी स्वच्छ धुवा. मटणाचा रस्सा, स्ट्यू आणि सॅलडमध्ये किंवा साधी भाजी बनवून कोबी खाऊ शकता.
- **कॅले** : कॅलेसारख्या उच्च फायबर असलेल्या भाज्यांमध्ये तृप्तता आणण्याची क्षमता असते, जे पचायला जास्त वेळ घेतात. यामुळे हे सुनिश्चित होते की ते खूप लवकर चयापचय होत नाही आणि रक्तातील साखरेची पातळी वाढवण्यास कारणीभूत ठरत नाही.

मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी

पोलीस यंत्रणेचा ढिसाळ कारभार; प्रवाशांना मनस्ताप

महाड : प्रतिनिधी

सलग ३ दिवसांच्या सुट्ट्या आणि चवदारतळे वर्धापनदिनासाठी आलेले भीमअनुयायी यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर नातेखिंड येथे रविवारी (दि. २०) सकाळपासूनच वाहतूक कोंडी झाली होती. सायंकाळी उशिरापर्यंत ही वाहतूक कोंडी सुटू न शकल्यामुळे कोकणात व मुंबईत जाणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल झाले आहेत.

चवदारतळे वर्धापनदिन, शिवजयंती आणि होळी आटोपून मुंबईत जाणारे चाकरमान्यांच्या शेकडो वाहनांमुळे आणि पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे या वाहतूक कोंडीला प्रवाशांना सामोरे जावे लागले आहे.

महाड चवदारतळे वर्धापनदिनी लाखोंचा भिमसागर देशभरातून येत असतो. कोरोनामुळे दोन वर्षांच्या प्रतिक्षेनंतर तिथीप्रमाणे आलेली शिवजयंती आणि होळीचा सण आटोपून कोकणातून चाकरमानी मुंबईत परतत आहेत. या गोष्टीची दखल पोलीस प्रशासनाने घेतली नसल्याने पर्यटक आणि चाकरमनी यांच्या वाहनांमुळे महाड येथील नातेखिंड येथे मुंबई-गोवा महामार्गावर सकाळपासून वाहतूक कोंडी झाली होती.

याच चौकातून एक मार्ग किल्ले रायगडकडे तर दुसरा मार्ग चवदार तळ्याकडे जातो. याच ठिकाणी निर्माण होत असलेल्या उड्डाणपुलाखाली अनेक टपरीधारक आणि भाजीविक्रेत्यांनी अनधिकृत दुकाने थाटली आहेत. ही दुकाने पोलिसांनी हटवणे गरजेचे होते.

महामार्गाचेही काम बंद ठेवून रविवारी एका दिवसासाठी अवजड वाहनांना महामार्गावर बंदी घालणे आवश्यक होते. मात्र पोलीस प्रशासन यात फेल ठरल्याचे बोलले जात आहे.

(छाया : महेश शिंदे)

▮ नियोजन नसल्याचा पर्यटकांनाही फटका

योग्य नियोजनाअभावी रविवारी सुमारे १२ तास वाहतूक कोंडी झाली होती. दोन्ही बाजूने दहा किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्यामुळे भिमसैनिक, शिवभक्त आणि चाकरमान्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला.

भाजपच्या वतीने महामानवाला अभिवादन

चवदार तळे विचार मंचकडून अन्नदान

महाड : प्रतिनिधी

महाड येथील चवदार तळे पाणीसंग्राम वर्धापन दिनी रविवारी (दि. २०) महाड भाजपाचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर व कार्यकर्त्यांनी महामान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले, तसेच चवदार तळे विचार मंचाच्या वतीने मोफत अन्नदान करण्यात आले.

महाड चवदार तळे येथे झालेल्या पाणीसंग्रामाच्या ९५ व्या वर्धापन दिनी रविवारी प्रचंड भिमसागर लोटला होता. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहराध्यक्ष निलेश तळवटकर, धामनसे, अप्पा सोंडकर, अदित्य भाटे, सई शिंदे यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महामानवास अभिवादन केले. त्याचप्रमाणे चवदार तळे विचार मंचाच्या वतीने पुस्तक दालन उभारण्यात आले होते.

येणाऱ्या भिमसैनिकांसाठी मोफत अन्नछत्र उभारण्यात आले होते. तसेच मंचाच्या वतीने येणाऱ्या भिमसैनिकांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

मुरूड : सलग तीन दिवस सुट्टी आल्याने मुरूडमध्ये पर्यटकांनी हजेरी लावली. सध्या तापमान वाढले असल्याने अनेक जण बर्फाचा गोळा खात ठंडा ठंडा कूल कूल होत आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

विघवली हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना निरोप

माणगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विघवली हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व सत्कार समारंभ नुकताच उत्साहात झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी भूषविले. या कार्यक्रमास संस्थेचे शाळेचे मुख्याध्यापक पारकर, संस्थेचे सहकार्यवाह दिलीप उभारे, संस्थेचे खजिनदार विनायक साबळे, सदस्य चंद्रकांत उभारे, पांडुरंग उभारे, पानावकर, यशवंत बक्कम, अनिल बेंदुगडे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे संस्थचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांना समाजभूषण पुरस्कार मिळाल्याने तसेच रायगड भूषण पुरस्कार २०२२ चे मानकरी संस्थेचे सहकार्यवाह शिक्षक दिलीप उभारे यांना विघवली विभाग शिक्षकांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी १० वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

खोपोलीमध्ये रक्तदान शिबिर उत्साहात

खोपोली : वार्ताहर

वासुदेव सेवामंडळ तसेच खोपोली येथील स्वराज्य मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २०) आयोजित रक्तदान शिबिरात ३७ दात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली.

खोपोली शहरातील वासुदेव सेवामंडळ तसेच मोगलवाडी येथील स्वराज्य मित्रमंडळ यांच्या वतीने किशोर ओसवल यांच्या निवासस्थानी समर्पण रक्तपेढी मुंबई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर झाले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी वासुदेव सेवामंडळाचे किशोर ओसवाल, संदेश पवार, चंद्रशेखर सोनी व स्वराज्य मित्रमंडळाचे अध्यक्ष प्रदीप देशमुख, उपाध्यक्ष आकाश क्षीरसागर, कार्यकर्ते सुनील जाधव, कल्पेश लोवंशी, प्रवीण पवार, सूर्यकांत पाटील, प्रसाद निकम, तन्मय देशमुख, हर्षद जाधव आदींनी विशेष प्रयत्न केले.

या वेळी वासुदेव सेवामंडळाचे प्रमुख कार्यकर्ते किशोर ओसवाल यांनी रक्तदान शिबिरासारखे कार्यक्रम सामाजिक कार्य करणाऱ्या मंडळाने आयोजित करावे. ती सर्वांची सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले. रक्तदान करणाऱ्या व शिबिर यशस्वी करणाऱ्या सर्वांचे त्यांनी यावेळी आभार मानले.

वावंढळ येथे मोफत फिरता दवाखाना

खालापूर : प्रतिनिधी

सिप्ला फाउंडेशन व हेल्पेज इंडिया यांच्या वतीने वावंढळ आनंदवाडी येथे मोफत फिरता दवाखान्याचे उद्घाटन करण्यात आले. चौक येथील सामाजिक कार्यकर्ते व विद्या प्रसारिणी सभा चौकचे सेक्रेटरी योगेंद्र शाह व महिला सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, सिप्ला फाउंडेशनच्या धुरी, राकेश कदम, आनंदवाडी ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

माणगाव कुणबी समाज मंडळातर्फे संत तुकाराम बीज

माणगाव : प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळातर्फे हभप जयराम खाडे महाराज यांच्या नेतृत्वाखाली जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीज व सत्कार सोहळा रविवारी (दि. २०) तालुका कुणबी विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाला.

या दिवशी सकाळी हभप गुगले महाराज निळगुण यांच्या हस्ते मूर्तीचे पूजन, कुणबी भवन परिसरात पालखी सोहळा, हभप पुंडलिक देसाई महाराज यांचे कीर्तन, दुपारी महाप्रसाद तसेच कुणबी समाजातील लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी सांगितले, समाजातील माणगाव नगरपंचायतीवर विराजमान झालेले नगराध्यक्ष व सर्व नगरसेविकांचे समाजाच्यावतीने मनापासून अभिनंदन करतो. या संधीचे आपण सोने कराल अशी मला खात्री आहे. नगराध्यक्षांनी समाज बांधवांचे काम प्राधान्याने करावे अशा सूचना त्यांनी केल्या.

बीज सोहळ्याचे संस्थापक तथा कुणबी समाजाचे ज्येष्ठ नेते रामभाऊ टेंबे यांनी सांगितले, सन २०१६ साली तालुका कुणबी समाज विकास मंडळाच्या वतीने आपण माणगावात तुकाराम महाराज बीज सोहळा सुरू केला त्याचे हे सातवे वर्ष आहे.

या कार्यक्रमास महिपत वाढवळ, टिकम भोनकर, वाढवळ गुरुजी, जयराम खाडे महाराज, मुरकर महाराज, सहादेव बक्कम, माजी सभापती संगिता बक्कम, सामाजिक कार्यकर्त्या शर्मिला सत्वे, माणगाव पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदिप खरंगटे, माजी स्विकृत नगरसेवक नितीन बामगुडे, सामाजिक कार्यकर्ते नथुराम पाष्टे, समाधान उतेकर, नितीन खडतर, कृष्ण पानावकर, रवींद्र अर्बन, नथुराम मोरे आदींसह साधुसंत व कुणबी समाज बांधव उपस्थित होते.

सामाजिक संघटनांनी शासन व लाभार्थ्यांमधील दुवा बनावे

▮ विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष भिकू इदाते यांचे आवाहन

अलिबाग : रामप्रहर वृत्त

केंद्र स्तरावरील विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष भिकू रामजी इदाते हे दि. १६ व १७ मार्च दरम्यान रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. गुरुवारी (दि. १७) जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागातील अधिकारी व विविध सामाजिक संघटनांची बैठक बोलविण्यात आली. या बैठकीत विविध कल्याणकारी योजनांचा लाभ गरजू व्यक्तींपर्यंत पोचविण्यासाठी सामाजिक संघटनांनी शासन व लाभार्थ्यांमधील दुवा बनून आपले योगदान द्यावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष भिकू रामजी इदाते यांनी सामाजिक संघटनांना केले.

या बैठकीस जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष डॉ. भरत बास्टेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव व इतर अधिकारी तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी सर्व उपस्थित अधिकारी, पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे स्वागत करून प्रस्तावना मांडली. अध्यक्ष भिकू रामजी इदाते यांनी या बैठकीमध्ये जात प्रमाणपत्रांची पडताळणी व विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्या कल्याणाकरिता चालविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती घेतली.

या वेळी योजना राबविताना येत असलेल्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती लोकसंख्येच्या प्रमाणात आश्रमशाळांची संख्या वाढविल्यास समाजातील विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार शिक्षण घेणे सुकर होईल व खासगी शाळांच्या भरमसाठ शुल्कातून त्यांची सुटका होईल, असेही ते म्हणाले.

भटक्या जमाती व विमुक्त जातींकरिता नवीन योजना

भारत सरकारकडून भटक्या जमाती व विमुक्त जातींकरिता जाहीर झालेल्या नवीन योजनांमध्ये एमपीएससी, यूपीएससी या परीक्षांची तयारी करण्यासाठी विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांना कोचिंग क्लासचा खर्च भारत सरकार करणार आहे. त्यासाठी SEED हे ऑनलाईन वेबपोर्टल सुरू करण्यात आले आहे. तसेच हेल्थ इन्शोरन्स ही एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेमध्ये प्रति कुटुंब पाच लाख रुपयांपर्यंत मदत कोणत्याही व्यक्तीस मिळते. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील व्यक्तींना घरकुल योजनेच्या धर्तीवर घरे देण्याची योजना या नव्याने सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

खाद्यपदार्थ व्यावसायिकांना दक्षतेचे आवाहन

अलिबाग : आजही अनेक हॉटेल्स, बेकरी, स्नॅक्स सेंटर, स्वीटमार्ट, वडापाव, भजी आणि भेळविक्रेते खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात बांधून देत आहेत. वर्तमानपत्राच्या शाईत केमिकल, घातक रंग असल्याने ते आरोग्यास घातक असल्यामुळे अन्नसुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात बांधून देण्यास मनाई केली आहे. त्यामुळे व्यावसायिकांनीही यापुढे अन्नपदार्थ ग्राहकांना वर्तमानपत्रामध्ये न देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी **मौजे कडाव**, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. रूस्तम कावसजी तारापोरवाला यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे-आर-पॉ)	आकार (रु.पै.)
४८	१	०-७६-४०	१-६९
४८	३	१-००-७०	३-९४
वरील मिळकतीपैकी विकत दिलेले क्षेत्र ०-८०-० हे.आर.पॉ.			

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०३/२०२२

सही/-
ॲड. राकेश भरत भोईर
ऑफीस - कशेळे, ता. कर्जत,
जि. रायगड. मो. ८१४९९४१८५२

राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्र उपविजेता

रायगडच्या अनुजला सुवर्णपदक

सुधागड : रामप्रहर वृत्त

पंजाबमधील लुधियाना येथील जीएसजी खालसा कॉलेज या ठिकाणी इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनने आयोजित केलेल्या वरिष्ठ गटातील राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाने उपविजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत रायगडच्या अनुज सरनाईकने नेत्रदीपक कामगिरी केली.

या स्पर्धेत ३२ राज्यांतील ७५० खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभ इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, डायरेक्टर जनरल मोहम्मद इक्बाल, जनरल सेक्रेटरी मुफ्ती हमिद यासिन, ॲलेक्स थॉमस, इरफान बुट्टो, टेक्निकल डायरेक्टर अब्दुल रझ्झाक, व्हाइस प्रेसिडेंट परविंदर वर्मा, जीएचजी खालसा कॉलेज गव्हर्निंग काऊन्सिल सेक्रेटरी डॉ. एस. एस. थिंद, प्रिन्सिपल डॉ. हरप्रीत सिंग, चंदिगढ पिंच्याक सिलॅट असोसिएशनचे सेक्रेटरी पार्थ भूषण लाल यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईकने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना ८५ ते ९० वजनी गटात पंजाब, राजस्थान, जम्मू काश्मीर (स्टेट पोलीस), कर्नाटक आणि अंतिम सामन्यात हरियाणाच्या खेळाडूला हरवून सुवर्णपदकावर नाव कोरले.

उपविजेत्या महाराष्ट्र संघाचे इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, महाराष्ट्र अध्यक्ष सुरेंद्रप्रताप सिंग, सहखजिनदार मुकेश सोनवाणे यांनी अभिनंदन केले.

अद्विक इलेव्हन संघ डब्ल्यूपीएलचा मानकरी

कर्जत : बातमीदार

कर्जत तालुक्यात वारे येथे होळीच्या सणाच्या निमित्ताने वारे प्रमियर लीग (डब्ल्यूपीएल) आयोजित करण्यात आली होती. यंदाच्या आठव्या हंगामातील या स्पर्धेचे विजेतेपद अद्विक इलेव्हन संघाने पटकाविले.

(छाया : संतोष पेरणे)

वारे येथील तृप्तश्वर मंदिराच्या प्रांगणात झालेल्या या स्पर्धेत ग्रामीण भागातील १६ संघांनी व एकूण १७६ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये द्वितीय क्रमांक पाटील बॉईज, तृतीय वेदिका इलेव्हन आणि चतुर्थ क्रमांक ओमकार इलेव्हन संघाने मिळविला.

पॅराऑलिम्पिकसाठी प्रशांत जाधवची निवड

महाड : महाड तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथील वेटलिफ्टर प्रशांत चायाजी जाधव याची कोलकाता येथे होणाऱ्या पॅराऑलिम्पिकसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संघात प्रशांतचा समावेश करण्यात आला आहे.

प्रशांत जाधव या दिव्यांग तरुणाने आपल्या दिव्यांगत्वावर मात करीत वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारात नाव उंचावले आहे. गेल्या अनेक वर्षांत मुंबईसह विविध ठिकाणच्या स्पर्धांमधून प्रशांतने यश संपादन केले आहे. प्रशांतच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची दखल घेत कोलकाता येथे होणाऱ्या पॅराऑलिम्पिकसाठी त्याची नियुक्ती करण्यात आली आहे. पॅराऑलिम्पिक स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य या संस्थेने ही नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबद्दल प्रशांतचे अभिनंदन होत असून अनेकांनी त्याला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी

सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धा

उरण : बातमीदार

उरण तालुक्यात अनेक अपघात होत असतात. अपघातग्रस्त सीएच (कस्टम हाऊस एजेंट) बांधवांच्या मदतीसाठी निधी उपलब्ध व्हावा या दृष्टिकोनातून न्हावा शेवा सीएचए संघटनेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ३ एप्रिल रोजी खोपटे येथील धसाखोशी मैदानात करण्यात आले आहे.

या क्रिकेट स्पर्धेचा सर्वांनी आनंद घ्यावा तसेच ज्यांना यासाठी आर्थिक मदत करायची आहे त्यांनी ९६६४७७११४० या नंबरवर रक्कम गुगल पे करावी. अधिक माहितीसाठी ९८३३५५२४०३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन न्हावा शेवा सीएचए संघटनेचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी केले आहे.

शेन वॉर्नला अखेरचा निरोप

मेलबर्न : वृत्तसंस्था

क्रिकेट जगतात आपल्या फिरकीची जादू दाखवून देणाऱ्या शेन वॉर्नला मेलबर्न येथील सेंट किल्डा फुटबॉल क्लबच्या मैदानात रविवारी (दि. २०) अखेरचा निरोप देण्यात आला. ४ मार्च २०२२ रोजी थायलंडमधील एका व्हिलामध्ये शेन वॉर्नचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते.

शेन वॉर्नच्या तीन मुलांसह वॉर्नचे आई-वडील अंत्यविधीला उपस्थित होते. त्यांच्याशिवाय ऑस्ट्रेलियन संघाचा माजी कर्णधार मार्क टेलर, एलन बॉर्डर, इंग्लंडचा माजी क्रिकेटर मायकल वॉन यांच्यासह ८० लोक वॉर्नला अखेरचा निरोप देण्यासाठी जमले होते.

भाजपप्रणित नवभारतीय शिव वाहतूक संघटना चषक स्पर्धा

मनपा सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून आयोजक, खेळाडूंना शुभेच्छा

पनवेल : रामप्रहर वृत्त

भाजपचे युवा नेते व पनवेल शहर प्रभाग क्रमांक १४चे उपाध्यक्ष शावेझ रिझवी यांच्या वतीने 'भाजपप्रणित नवभारतीय शिव वाहतूक संघटना चषक २०२२' या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शहरातील छत्रपती संभाजी महाराज मैदानात सुरू असून या स्पर्धेला महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. २०) भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या वेळी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, मुकीद काझी, भाजपप्रणित नवभारतीय शिव वाहतूक संघटनेचे माजी प्रदेश चिटणीस उबेद पवार, अल्पसंख्याक युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष जव्वाद काझी, पनवेल शहर अध्यक्ष निसार सय्यद, कादिर शेख, राजूभाई पटेल, सुफियान पटेल, रोहित आटवणे, अजय पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

पनवेल : संत तुकाराम महाराज बीज रविवारी सर्वत्र भक्तिमय वातावरणात झाली. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी गव्हाण-कोपर येथील मंदिराला भेट देत तुकाराम महाराजांच्या मूर्तीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, माजी पं. स. सदस्य भाऊशेठ पाटील, माजी उपसरपंच पांडुशेठ घरत, रामदास ठाकूर, किशोर पाटील, सुधीर ठाकूर, जयवंत देशमुख, अनंता ठाकूर, रामदास घरत, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, उलवे नोड उपाध्यक्ष सुजाता पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक, ग्रामस्थ उपस्थित होते.

गॅलरी कोसळून २०० प्रेक्षक जखमी

मलप्पुरम : केरळमध्ये शनिवारी (दि. १९) रात्री एका फुटबॉल सामन्यात मोठी दुर्घटना घडली. मलप्पुरम जिल्ह्यातील पुंगोड येथे एका स्थानिक फुटबॉल सामन्यात गॅलरी कोसळली. या दुर्घटनेत जवळपास २०० जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी पाच जण गंभीर असल्याचे कळते.

सामना पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. फुटबॉल सामन्यासाठी उभारण्यात आलेली तात्पुरत्या स्वरुपाची गॅलरी क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाल्याने अचानक कोसळली. या गॅलरीसोबत त्याच्या शेजारी उभा करण्यात आलेला लाईटचा मोठा पोलदेखील कोसळला. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com